डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृविके/ठेकामजूर/ ४२/२०२० दिनांक :- 18 JUN 2020

## जाहीर नोटीस

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील शेळीपालन व कुक्कूटपालन संचातील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. ०१/०७/२०२० ते दि. ३०/०९/२०२० या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक दि. २६.०६.२०२० पर्यत या कार्यालयास सादर करावे.

**करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | शेळी पालन संच | संचाची दैनंदीन साफसफाई करणे, शेळ्या चरायला नेणे, चारा/झाडपाला आणणे, खाद्यपाणी करणे, सुचनेनुसार लसीकरण तसेच औषधोपचार यासाठी मदत करणे, प्लॉट तयार करून चारा/झाडपाला लागवड करणे, तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०१ |
| ०२ | कुक्कूट पालन संच | कुक्कूटपालन संचात पक्षी आणण्यापुर्वी साफसफाई करणे, भुसा आणून पसरवून घेणे, खाद्यपाण्याची भांडी धुऊन घेणे, पक्ष्यांना खाद्यपाणी करणे, संचाची दैनंदीन साफसफाई करणे, सुचनेनुसार लसीकरण तसेच औषधोपचार करणे, पक्षीविक्री पुर्ण झाल्यानंतर पोल्ट्रीखत पिशव्यांत भरणे तसेच अनुषंगिक इतर कामे करणे. | ०१ |
| | | एकूण | ०२ |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :-**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. ( सका. ०८ ते १२ व दुपारी ०२ ते ०५.४५ )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास संपर्क साधावा.( सका. ९.४५ ते ०१.३० व दुपारी ०२ ते ०६.१५ )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

**कार्यक्रम समन्वयक,**
कृषि विज्ञान केंद्र,
देवधे, ता.लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :-**

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली
/- सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.